नि.दि.दा.क्र.१०४/२०१७

अल्काबाई वि. रामजी

**निशाणी २४ खाली**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.डी. डांगे यांच्याकडुन सुरु.</u>**

११. माझे शिक्षण झालेले नसुन मला लिहीता–वाचता येत नाही. मला फक्त सही करता येते. माझ्या वडीलांची गट नंबर मला सांगता येणार नाही परंतु त्यांची जमीन ७ एकर ३ गुंठे इतकी आहे. मी गेले चाळीस वर्षापासुन एकता नगर, जटवाडा रोड, हर्सुल, औरंगाबाद येथे राहते. मला त्या जमीनीचा सर्व्हे नंबर सध्या आठवत नाही. माझ्या शपथपत्रामध्ये मी त्या गट नंबर व सर्व्हे नंबरचा उल्लेख केला असुन आता मला ते आठवत नाही. माझे वडीलांना दोन भाऊ नामे लक्ष्मण आणि भिमराव असे आहेत.

१२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०५.१९६९ रोजी मौजे हिवरा येथील सर्व्हे नं.१६ मधुन ३२ एकर २४ गुंठे इतकी जमीन रामजी व लक्ष्मण यांनी ठमा बारकु रघु, रामराव सयाजी, कचरु सयाजी, पांडुरंग आश्रु, अबळाजी आश्रु आणि सुभाषजी आश्रु यांच्याकडुन रक्कम रु.६,०००/– मध्ये खरेदीखत क्र.१६१३ नुसार विकत घेतली होती. साक्षीदार सांगत आहे की, आमची आजोबा–पंजोबाची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं.१६ मधील जमीन पुढे रामजी व लक्ष्मण यांच्या नावे आली. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं.१६ मधील जमीनीपैकी माझे वडील रामजी यांच्या हिश्याला ७ एकर ३ गुंठे इतकी जमीन आली. सर्व्हे नं.१६ चा पुढे गट नं.४५ झाला किंवा कसे हे आता मला आठवत नाही. मी माझ्या वडीलांच्या जमीनीचा ७/१२ उतारा पाहिला नाही.

**प्रश्नः** तुमच्या वडीलांनी तुमचे भाऊ सिध्दार्थ व गौतम यांना गट नं.४५ मधील त्यांच्या हिश्याला आलेली ७ एकर ३ गुंठे जमीन सारख्या प्रमाणे वाटुन दिली होती का?

**उत्तरः** माझ्या वडीलांनी सिध्दार्थ व गौतम यांना गट नं.४५ मधील ७ एकर ३ गुंठे जमीन मला न सांगता माझ्या माघारी नावे करुन दिली.

१३. माझ्या मुलाचे नांव रवि वाघ असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वकीलांकडे कागदपत्रे घेऊन माझा मुलगा आला होता. माझ्या वडीलांनी सिध्दार्थ व गौतम यांना वाटुन दिलेली जमीनीच्या अनुषंगाने फेर क्र.९२९ हा मंजुर झाला याबाबत मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेर क्र.९२९ अन्वये माझे काका लक्ष्मण यांनी त्यांची जमीन वाटुन घेतली. हे म्हणणे खरे नाही

की, सिध्दार्थ रामजी भिवसने हा १ हेक्टर ३१ आर पोटखराब ५ आर या जमीनीचा मालक व वहितीदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, गौतम रामजी भिवसने हा देखील १ हेक्टर ४२ आर पोटखराब ५ आर या जमीनीचा मालक व वहितीदार आहे. ७/१२ प्रमाणे नावावर आलेल्या जमीनीच्या सिध्दार्थ व गौतम हे ताब्यात आहेत. आमच्यामध्ये सर्वात मोठी बहिण लताबाई असुन त्यानंतर मी व माझ्यानंतर गौतमचा जन्म झाला व त्यानंतर बेबीचा जन्म झाला व शेवटी सिध्दार्थ याचा जन्म झाला.

१४. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा सर्व बहिण–भावांचे लग्न माझ्या वडीलांनी लावुन दिले होते. साक्षीदार सांगत आहे की, आमचे लग्न साखरपुड्यात करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, लताबाई ही नर्स म्हणुन नोकरीला होती व आता ती सेवानिवृत्त झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेबीताई ही बालवाडी शिक्षीका म्हणुन नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी लताबाई हिला नर्स म्हणुन नोकरीला लावले होते. हे म्हणणे खरे नाही की, बेबीताई हिला माझी बहिण लताबाई हिने नोकरीला लावुन दिले होते.

१५. मी एकता नगर येथे राहते ती मिळकत माझ्या नावाने आहे. साक्षीदार पुढे सांगत आहे की, मी तेथे किरायाने राहते, ती जागा माझ्या मालकीची नाही. हे म्हणणे खरे नाही की, सध्या मी राहत असलेले एकतानगर येथील प्लॉट माझ्या वडीलांनी मला घेऊन दिले व त्यावर त्यांनी मला बांधकाम करुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी माझ्या वडीलांना पंधरा लाख रुपये इतका खर्च आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दोन्ही मुलांच्या अभ्यासाचा व सांभाळण्याचा खर्च माझ्या वडीलांनी केला.

१६. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.४५ मधील माझ्या वडीलांच्या नावे असलेली ७ एकर ३ गुंठे जमीनीवर माझा कोणताही हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.४५ मधील जमीनीमध्ये माझा कोणताही वाटेहिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिवादींबरोबर बोलणे नाही. माझ्या व प्रतिवादींमध्ये कोणतेही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आतापर्यंत माझे व प्रतिवादींमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद झालेला नाही. मी दोन वर्षापुर्वी हिवरा गावी गेले होते. त्या आधी देखील मी हिवरा गावी येत–जात हाते. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.४५ मधील ७ एकर ३ गुंठे जमीनीबाबत माझे प्रतिवादींसोबत वाद झाले नव्हते. माझे त्याबाबत प्रतिवादींसोबत कधी वाद झाले होते त्याची नेमकी तारीख आता मला सांगता येणार नाही.

१७. माझ्या पतीचे नांव सिध्दार्थ वाघ असुन त्यांना दारु पिण्याची सवय होती. माझा मोठा मुलगा मॅट्रीकला असल्यापासुन माझे पती मला व माझ्या मुलांना सोडुन गेले. साक्षीदार सांगत आहे की, माझ्या मुलांना मी स्वतः वाढविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कधी माझे वडील व माझे भावांना मला हिस्सा द्या असे म्हणाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कधी प्रतिवादींकडुन कोणताही हिस्सा मागितला नाही व ती जमीन प्रतिवादी इतरांना विकतील अशी त्यांनी मला धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमची वडीलोपार्जित व एकत्रीत कुटूंबाची मिळकत नाही.

१८. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई घसरुन पडल्यामुळे तिच्या पाठीचे हाड मोडले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे हाड मोडले असल्याने त्याचा खर्च रक्कम रु.५,००,०००/– इतका आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सिध्दार्थ आणि गौतम यांनी तो खर्च केला होता. साक्षीदार स्वतःहुन सांगत आहे की, माझ्या आईचा उपचार सरकारी दवाखान्यात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळेस माझ्या आईला एकदा देखील भेटायला गेली नाही व त्याच्या आजारपणात त्यांना पाहण्यासाठी व तिची विचारपुस करण्यासाठी मी कधीही गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना त्रास देणेकामी मी सदरचा खोटा दावा दाखल केला.

**प्रश्नः** तुमच्या मुलाने त्या घरावरती कर्ज घेतले होते?

**उत्तरः** माझ्या मुलाने घेतलेले कर्ज मी फेडले होते, माझ्या मुलाने त्याच्या नावे एकता नगर येथे प्लॉट घेतलेला आहे. मी किरायाच्या घरातच राहते.

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने काढलेले कर्ज सिध्दार्थ आणि गौतम यांनी फेडावे असे माझे म्हणणे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना खोट्या नोटिस पाठविल्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना खोट्या नोटिस पाठवुन व त्यांच्याविरुध्द सदरचा खोटा दावा आणुन मी त्यांना मानसिक त्रास दिला. मी औरंगाबाद येथे राहायला आल्यानंतर माझे दोन्ही भाऊ सिध्दार्थ व गौतम हे एक ते दोन वर्षानंतर औरंगाबाद येथे राहायला आले. मी, सिध्दार्थ आणि गौतम आम्ही एकाच गल्लीत राहतो. साक्षीदार पुन्हा सांगत आहे की, मी, माझी मोठी बहिण आणि लहान भाऊ सिध्दार्थ असे आम्ही एकाच गल्लीत राहतो. गौतम हा आमच्यापासुन एक ते दिड किलोमिटर अंतरावर राहतो.

**प्रश्नः** सिध्दार्थ आणि गौतम हे त्यांच्या स्वतःच्या घरात राहतात.?

**उत्तरः** सिध्दार्थ आणि गौतम यांनी जमीनी विकुन त्यांची घरं घेतली.

२०. सिध्दार्थ आणि गौतम यांनी कोणती जमीन विकली त्याचे कागदपत्र माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन खोटे शपथपत्र व कागदपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला,**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

VRUSHALI VIJAYKUMAR RAOJADEJA

Digitally signed by VRUSHALI VIJAYKUMAR RAOJADEJA
Date: 2023.10.04 12:18:06 +0530

**(व्ही. व्ही. रावजाडेजा)**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**

**दि.०३.१०.२०२३**